श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी

श्रीबाबाजीमहाराज पंडित

स्तुति-सुमने

*

श्रीस्कंददास-अपराधक्षमापन स्तोत्र

*

श्रीस्कंददास स्वामी

*

स्कंददास आई !

*

आरती

*



श्री बाबाजीमहाराज पंडित

जन्मदिन : मकरसंक्रमण / १२ जानेवारी १८८६

निर्याण : १ फेब्रुवारी १९६४

१

श्रीमहाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार

श्रीबाबाजीमहाराज पंडित

'गुरुभक्तीची परी । सांगो गा अवधारी'

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले.१९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल घरदार शिक्षण वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला.महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहानमोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत ते होते. त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच काहीहि मागितलं नाही.त्यांचं ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्गार काढले - **''मी पंडिताला वश झालो आहे''** गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन आशीर्वाद दिला - **''अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही, माझे ग्रंथ वाच. तुला समजतील.''**

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं.' पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं. त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत अन् पंडितांच्या अखंड परिश्रमांनी महाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली.दृष्ट लागावं असं अक्षरशिल्प मुद्रांकित झालं अन् सर्वांना उपलब्ध झालं!

* * *

२

श्रीबाबाजीमहाराज पंडित विरचित

आरती : श्रीगुलाबरावमहाराजांची

जयदेव जयदेव पांडुरंगनाथा ।
आरती ओवाळिता हरली भवचिंता ।।धृ०।।
अनंत काळाची जीवाशिवा तुटी ।
वारूनि उपाधी कराविशी भेटी ।।१।।
भक्तिप्रेमपिसें साकारा आला ।
साच केले 'एकाकी न रमते' या बोला ।।२।।
भावे वंदितो मी सुकुमार पायां ।
ज्ञानेश्वरकन्ये निवारावी माया ।।३।।
जयदेव जयदेव पांडुरंगनाथा ।।धृ०।।

***

श्री बाबाजीमहाराज पंडित विरचित ग्रंथ

* हरिपाठरहस्य
* ज्ञानेश्वरीगूढार्थदीपिका
* आर्यधर्मोपपत्ति
* विविध लेखसंग्रह
* वेदस्तुतिदीपिका
* संतकथा
* विचारमौक्तिकमाला
* सार्थ भक्तिपदतीर्थामृत
* अमृतानुभव कौमुदी
* अभंगगाथा
* पंचदशी प्रवचने
* भागवतप्रवचने
* सार्थ प्रीतिनर्तन
* सार्थ गीता
* सार्थ हरिपाठ
* सार्थ स्वमतनिर्णः
* सार्थ भगवद्भक्तिसौरभ (रुक्मिणीपत्रिका)

३

श्री बाबाजीमहाराज पंडित

मधुराद्वैताचार्य प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी आणि मधुराद्वैत संप्रदायाचे द्वितीय आचार्य श्री नारायण पैकाजी पंडित उर्फ ''श्रीबाबाजी महाराज'' यांचा जन्म चंद्रपूर येथे मकरसंक्रांति/१२ जाने. १८८६ रोजी झाला. आणि १ फेब्रु.१९६४ रोजीं त्यांनी अमरावती येथील ज्ञानेश्वर मंदिरात शिवरात्रीनवरात्राच्या प्रथमदिनी देह ठेवला. वयाच्या १९ व्या वर्षी इ. स. १९०५ मध्ये आईवडिल, शिक्षण, नोकरी वगैरे सर्व सोडून श्रीगुलाबराव महाराजांच्या सेवेत त्यांनी स्वतःला झोकून दिले. या गुरुशिष्यांच्या वयात केवळ २-३ वर्षांचे अंतर होते. पण तरीहि पराकोटीची गुरुभक्ति पंडितांच्या हृदयात अंकुरली आणि ती पानोपानी फुलतच गेली. पंडितांनी कपडे धुण्यापासून, स्वयंपाकपाण्यापासून तर ग्रंथलेखन करण्यापर्यंत सर्व लहान मोठी कामे उत्साहाने केलीत. महाराजांचा एकही शब्द खाली पडू दिला नाही. जणुंकाही पंडितांच्या रूपाने ज्ञानेश्वरीत वर्णिलेली आचार्योपासना म्हणजे गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

अन् त्याची परिणती म्हणून श्रीगुलाबराव महाराजांचे मुखातून

'माझे ग्रंथ तूं वाच. तुला ते समजतील'

असा अमोघ आशिर्वाद पंडितांना मिळाला. खऱ्या शिष्योत्तमाला याहून मोठा असा कोणता परमार्थ साधावयाचा असतो ?

रात्र दिवस नेणे । थोडे बहु न म्हणे ॥
लोण करी सकळा । जीविताचे ॥

अशी पंडितांची एकविध अवस्था होती.

महाराजांच्या ग्रंथनिरूपणाच्या वेग अति शीघ्र असे. त्यामुळे बहुतेक निरूपणे लेखनबद्ध होण्याची राहूनच गेलीत. पण ''मी हळूहळू सांगतो. तुम्ही लिहा'' असे म्हणून महाराजांनी सावकाश सांगितलेले तेवढेच वाङ्मय आज उपलब्ध आहे. अन् हे सर्व लेखन हरिअण्णा केवले, पंडित, वगैरे तीन चार जणांनी उतरून घेतले. पुढे महाराजांच्या निर्वाणानंतर सर्व लेखन सुवाच्य अक्षरात लिहून आणि संपादन करून पंडितांनी सर्वप्रथम प्रकाशित केले. त्यामुळेच आज संस्कृत-मराठी-हिंदीतून असलेली महाराजांची प्रचंड साहित्यसंपदा अभ्यासकांसमोर आली आहे. महाराजांनी १९१५ मध्ये वैकुंठी गमन केले आणि तेव्हापासून संप्रदायासाठी पंडितांनी जीवन वेचले. ग्रंथप्रकाशन, ग्रंथालयाची उत्तम व्यवस्था, कात्यायनी, जन्माष्टमी वगैरे उत्सवपरंपरा वृद्धिंगत केल्या.

त्यांनी १२०० अभंगांची रचना केली. हरिपाठरहस्य, अमृतानुभवकौमुदी व ज्ञानेश्वरी-गूढार्थदीपिका या वारकऱ्यांच्या प्रस्थान त्रयीवर भाष्ये लिहिलीत. महाराजांच्या अनेक ग्रंथांवर विवरणे लिहिलीत. राष्ट्रविषयावर, धर्मविषयावर आणि भक्ति वेदान्तावर अनेक लेख लिहिलेत. तसेच श्रीमहाराजांच्या नानाविध ज्ञानक्षेत्रातील नव्या योगदानाला सर्वदूर प्रकाशित केले. त्यात महत्वाचे म्हणजे शंकराचार्यांच्या अद्वैतरूपी सुवर्णावर संतांची सगुणभक्ति अलंकाराप्रमाणे कशी शोभायमान झाली आहे याचे सविस्तर खंडनमंडनपूर्वक विवेचन करून शांकर अद्वैत तत्त्वज्ञानाच्या आधारावरच श्रीगुलाबराव महाराजांचा भगवंताच्या अवतारविग्रहा-संबंधीचा **''अनध्यस्तविवर्त''** या नव्या संज्ञेत साठविलेला भक्तिसिद्धान्त कसा परिपुष्ट झाला आहे हे दाखवून दिले. त्याचबरोबर वारकरी बंधूंनी वेदान्तासाठी - निर्गुणाहून सगुणाला न्यून मानणाऱ्या पं. निश्चलदासजींना शरण जाण्याचे कारण नसून श्रीगुलाबरावमहाराजांच्या वाङ्मयातूनच संतांना अभिप्रेत असलेल्या अद्वैत ज्ञानोत्तर भक्तीची सिद्धी समजून घेण्याची आवश्यकता कशी आहे हे पंडितांच्या पाचसहा हजार पृष्ठांच्या साहित्याच्या परिशीलनावरून सहज लक्षात येण्यासारखे आहे.

या लघु पुस्तिकेत सद्गुरुश्रीबाबाजी महाराजांवरील श्री भाऊ घुई, श्री आबाजी कानविंदे, (इंदूर) श्री. बाबा महाजन (खामगाव) यांनी रचलेल्या काव्यरचना प्रकाशित करीत आहोत. ।।श्रीकृष्णार्पणमस्तु।।

- ***बाबुराव तारणेकर***

***

श्रीस्कंददासमहाराज

अपराधक्षमापन स्तोत्र

भिंड / २०-७-१९६४

कवि : यशवंतराव उर्फ आबाजी कानविंदे

।। श्रीज्ञाराजमाउली ।।

गर्भात दुःखे बहु शीणविले ।
त्यांतून ज्याने मज सोडविले ।
भुले कसा त्याच जगन्निवासा ।
क्षमा करा श्री गुरुस्कंददासा ।।१।।

बाल्यीं पिपासा मज दुग्धपानी ।
क्रीडार्थ खेळातचि सौख्य मानी ।
भयार्त मी बागुल भीति-भासा ।
क्षमा करा श्री गुरुस्कंददासा ।।२।।

पुढे प्रवेशा करि यौवनांत ।
स्त्री वित्त थैमान करी मनांत ।
भोगीं भ्रमी मी जळीं जेवि मासा ।
क्षमा करा श्री गुरुस्कंददासा ।।३।।

मी कामकामी, मज दंभ मान ।
गुणी जना मानि तृणा समान ।
धनि जनांच्या नमि दासदासा ।
क्षमा करा श्री गुरुस्कंददासा ।।४।।

अमंत्र माझी अविधिच अर्चा ।
अर्चेमधीं आणित विश्व-चर्चा ।
अंति स्मरेनाच अलंदिवासा ।
क्षमा करा श्री गुरुस्कंददासा ।।५।।

सत्पात्री तीर्थी न सुटेचि पैसा ।
आल्या अतीता न म्हणेचि बैसा ।
बुभुक्षु मी विश्व पुरे न घासा ।
क्षमा करा श्री गुरुस्कंददासा ।।६।।

फलार्थ पूजी बहु देवतांना ।
वित्तादि भोगासि समर्पि त्यांना ।
तथापि होती न प्रसन्न दासां ।
क्षमा करा श्री गुरुस्कंददासा ।।७।।

भ्रमी साधु-संगे मठीं रानरानीं ।
प्रयागादि तीर्थे श्रुतें पुराणीं ।
नसे दुजा लाभ विना प्रयासी ।
क्षमा करा श्रीगुरुस्कंददासा ।।८।।

उपाय होती अवघे अपाय ।
ललाटिंचा लेख चुकेल काय ?
मुके दोन्ही लोकां जगिं होय हाय ।
क्षमा करा श्रीगुरुस्कंददासा ।।९।।

जरागुणे जर्जर होय काया ।
तथापि जीर्णा न प्रपंचि माया ।
नामाविणें पावत आयु ऱ्हासा ।
क्षमा करा श्रीगुरुस्कंददासा ।।१०।।

ये अंतिंचा काळ समीप घोर ।
त्रिदोष अंगीं करितीच जोर ।
श्लेष्मा उरी शक्ति नुरेचि श्वासा ।
क्षमा करा श्रीगुरुस्कंददासा ।।११।।

जन्मात आले मुखिं नाही नाम ।
प्रसंगी ते देईल काय काम ।
धावे गजेंद्रा परि पाव दासा ।
क्षमा करा श्रीगुरुस्कंददासा ।।१२।।

तूं एक पावन पतीत असे मी रंक ।
लागो न ब्रीदासी तुझ्या कलंक ।
धावें, उभा घेऊनी काळ फासां ।
क्षमा करा श्री गुरुस्कंददासा।।१३।।

चिदानंद काया तुझी ही विशुद्ध ।
परि मानुषी मानिली म्यां अशुद्ध ।
क्षमा करावी मज द्यावि शिक्षा ।
परंतु व्हावी न कधी उपेक्षा ।।१४।।

नसे जगीं मत्सम पापकर्ता ।
जगीं नसे त्वत्सम पापहर्ता ।
विनम्र माझे वच आयकावे ।
इच्छेसि येईल तसे करावे ।।१५।।

दैवें तुझे पाय दिसोनि माते ।
उपेक्षिले म्यां विसरोनि नाते ।
क्षमापनस्तोत्रचि अल्पसेवा ।
मानोनि पायीं 'यशवंत'ठेवा ।।१६।।

।।श्रीस्कंददास-अपराधक्षमापनस्तोत्रं संपूर्णम् ।।

।।श्रीकृष्णार्पणमस्तु।।

***

४

श्री स्कंददास स्वामी

सद्गुरु श्रीबाबाजीमहाराज पंडित यांचे चरित्र

कवि : बाबा महाज खामगाव

इरईच्या काठी सुंदर नगरी,
नाव चंद्रपूरी साजे तीस ।
निसर्गाची कृपा रम्य परिसर,
भोवती डोंगर वृक्षवेली ।
संतांची नगरी परम पावन,
करि संरक्षण कालीमाता ।
तिथे जन्म झाला सद्गुरु स्वामिचा,
पंडित कुळींचा भाग्यसूर्य ।
स्कंददास नामे कीर्ती आज गाजे,
हृदयी विराजे मूर्ती त्यांची ॥१॥
मोहोड वंशाचे भूषण कुळाचे,
भाग्य हिंदुभूचे संतथोर ।
पांडुरंगनाथ ऐसे त्यांचे नांव,
पदी जडे भाव पंडितांचा ।
सर्वशक्तिमत्ता सर्वज्ञताहि तैसी,
वसे त्यांच्यापाशी देखोनिया ।
ज्ञानेशाची कन्या कृष्णाची ही पत्नी,
त्यांची मधुराभक्ती जाणूनीया ।
ऐशा संतश्रेष्ठा मानुनी सद्गुरू,
सेवा केली सुरू पंडितांनी ।
धर्म प्रेम आज्ञा गुरूची पाळूनी,
तोषविले त्यांनी गुरूराया ।
स्कंददास स्वामी कीर्ती आज गाजे,
हृदयी विराजे मूर्ती त्यांची ॥२॥
सद्गुरुसेवेचा मनी एक ध्यास,
केली रात्रंदिवस प्रेमाने ती ।
झिजविली काया दमविले मन,
वेचियेले धन याच साठी ।
सद्गुरु संपर्क सच्छिष्यासि येता,
सारे काही हाता शिष्याच्या ये ।
संसार सुखाची मागणी न केली,
वैराग्याची दिली ग्वाही त्यांनी ।
वृत्तीची परिक्षा उत्तीर्ण जहाले,
सद्गुरु बोलले वाक्य ऐका ।
'सेवेला जहालो पंडिताच्या वश'
पंडिता संतोष होय तेणे ।
स्कंददास स्वामी कीर्ती आज गाजे
हृदयी विराजे मूर्ती त्यांची ॥३॥
मधुरा आणिक अद्वैत भक्तीचा,
संप्रदाय साचा स्थापियेला ।
पहिले आचार्य पांडुरंगनाथ,
त्यांचा वरदहस्त पंडितांसी ।
द्वितीय आचार्य नेमिले पंडितां,
दाविली योग्यता पंडितांनी ।
वाढविला त्यांनी संप्रदाय थोर,
आचार विचार सांभाळूनी ।
ग्रंथ ठेवा थोर सद्गुरु स्वामीचा,
प्रचार तयाचा बहू केला ।
ग्रंथ श्रीगुरूंचे प्रकाशित केले,
वाचका लाभले सर्वदूर ।
ग्रंथांवरि भाष्य लिहूनी गुरूंचे,
काठिण्य तयांचे दूर केले ।

स्कंददास स्वामी कीर्ती आज गाजे
हृदयी विराजे मूर्ती त्यांची ॥४॥
पंडितांच्या कूळी जन्म त्यांचा झाला,
पंडित नावाला सार्थ केले।
ज्ञानेश्वरीग्रंथ शुद्ध प्राकृतात,
परि तो यथार्थ आकळेना ।
गूढार्थदीपिका लिहूनिया टीका,
गूढार्थ साधका सांगीयेला ।
अमृतानुभव सिद्धांसाठी ग्रंथ,
त्याचाही यथार्थ आकळेना ।
लिहिली कौमुदी पाडिला प्रकाश,
तेणे हो संतोष सिद्धांनाही ।
अभंग हरिपाठ सोप्या मराठीत,
भरला गूढार्थ कळेना तो ।
लिहिले रहस्य सोय झाली तेणे,
आनंदली मने भाविकांची ।
प्रस्थानत्रयी ही ज्ञानेशांची थोर,
तिचे भाष्यकार पंडित हे ।
स्कंददास स्वामी कीर्ती आज गाजे
हृदयी विराजे मूर्ती त्यांची ॥५॥

***

५

! स्कंददास आई !

विनवणी

तुझे आणि माझे जोडिले मी नाते,
तुला मान्य होते अथवा न होते ।
मला ओळखती आता तुझा बाळ,
बोलती सकळ आता तैसे ।
बरे वाइट गे होता माझ्या हाते,
दूषण तुला ते लावितील ।
स्कंददास आई विनवीतो दास,
पायापाशी त्यास द्यावी जागा ॥१॥
चाळविती चित्ता सहाही विकार,
क्षण एक स्थीर राहते ना ।
पाचही विषय त्याच्या आवडीचे,
मात्र नावडीचे ऐक आई ।
तुझीया सेवेची अगदी नावड,
कराया सवड नाही नाही ।
अभ्यास वैराग्ये चित्त ये वठणी,
पतंजली मुनी बोलिले हे ।
स्कंददास आई, वाटे हे कठीण,
तुझे श्रीचरण सोडीना मी ॥२॥
माझिया आईने धरिला अबोला,
सांगा हो तियेला बोलायासी ।
लेकुराची माझी पाहाहो फजीती,
घाला हो माहिती कानी तिच्या ।
सारखा आक्रोश करितो कधीचा,
जन्माच्या आधीचा कैक जन्म ।
आता नको जन्म कंटाळलो आई,

सुख तुझे पायी कळो आले ।
स्कंददास आई ज्ञानोत्तर आता,
ठेवितसे माथा तुझे पायी ॥३॥
ज्ञानिया बाळांची म्हणविते आई,
माझ्याकडे पाही जरा माते ।
काय माझे ध्यान काय माझे ज्ञान,
हासतांती जन पाहोनीया ।
तुझे नाव घेती म्हणती कशाला,
आला हा वेंधळा हिच्यापोटी ।
स्कंददास आई समर्थ तूं माते,
उपेक्षा का करिते सांग माझी ॥४॥
किती मोठा कोणी करो चमत्कार,
ढुंकुनी बघणार नाही आता ।
ज्ञान सांगो कोणी अगाध अपार,
नाही धावणार त्याच्या मागे ।
आता तुझे पायी जडे माझा भाव,
आता धावाधाव दूर झाली ।
स्कंददास आई तूं माझी माउली,
सर्वस्व जाहली तूंच आता ॥५॥
साजिरे गोजिरे रूप माउलीचे,
माझीया प्रीतीचे अधिष्ठान ।
षड्गुण ऐश्वर्ये माउली सम्पन्न,
झाली स्थानापन्न हृदयी माझ्या ।
झालो मी निश्चिंत एकमात्र चिंता,
जावो ती न आता दूर कोठे ।
स्कंददास आई निश्चिंत मी आता,
कृपाकर माथा ठेविला तूं ॥६॥

*